# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**तक्रार क्र. : २१/२०१७/नंदुरबार**

१ श्री. देवमन नारायण आहेरराव, : अपिलार्थी
मु.पो.खांडबारा,
ता.नवापूर, जि.नंदुरबार.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : प्रतिवादी
उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
ता.जि.नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा, : प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार,
ता.जि.नंदुरबार.

**सुनावणीचा दिनांक - २६/०३/२०१९**

तक्रारदार यांनी दिनांक १६/०८/२०१७ अन्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २६/०३/२०१९ रोजी सुनावणीवेळी तक्रारदार अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते.

सुनावणीवेळी तक्रारदार यांच्या तक्रारीचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, तक्रारदार यांच्या दिनांक ०६/०९/२०१४ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात नाशिक खंडपीठाकडील द्वितीय अपील क्रमांक ३००/२०१५/नंदुरबार च्या संदर्भात दिनांक २०/०४/२०१७ रोजी सुनावणी घेऊन आदेशात विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदरचे आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०९/२०१४ रोजीच्या माहिती अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीमधील अर्जदारांचा वैयक्तिक तपशील (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक, इत्यादी) वगळून अन्य मागितलेली माहिती अपिलार्थी यांस नोंदणीकृत पोचदेय डाकेने पुरवावी, असे निर्देश दिले होते. त्यानुसार तक्रारदार यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही केली नसल्याचे तक्रारीत नमुद केले.

सुनावणीवेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांचेप्रतिनिधी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांच्या द्वितीय अपील क्रमांक ३००/२०१५/नंदुरबार, दिनांक २०/०४/२०१७ रोजी दिलेल्या आदेशानुसार संबंधित तत्कालीन जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविली आहे. त्याबाबतची स्थळप्रत आयोगास सादर करीत आहे.

सुनावणीवेळीचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने वर नमूद केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशाप्रमाणे अपिलार्थीस दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविल्याचे दिसून येते. तथापि, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतर सुमारे १ वर्षे ८ महिने उशिराने माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांचा याबाबत अधिनियमातील कलम २० (१) अन्वये रुपये २५०००/- शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नंदुरबार यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ०६/०९/२०१४ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन आयोगाच्या आदेशानुसार सुमारे १ वर्षे ८ महिने उशिराने माहिती पुरविल्याचे स्पष्ट होते. म्हणुन त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) अन्वये रुपये २५०००/- शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगासमोर सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत तक्रार क्रमांक २१/२०१७/नंदुरबार निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(के.एल.बिश्नोई)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

प्रति,

श्री. आर.एल.माळी (तत्कालीन जन माहिती अधिकारी), सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक, जिल्हा परिषद कार्यालय, जळगाव, ता.जि.जळगाव.

**प्रत माहितीस्तव आणि राज्य माहिती आयोगाने आदेशित केल्यानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना आपल्या स्तरावरुन सर्व संबंधिताना देण्यासाठी अग्रेषित :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, जळगाव, ता.जि.जळगाव.

क्र.रामाआ- नाशिक/तक्रार क्र.२१/२०१७/नंदुरबार/आ १६६९ दिनांक 16 APR 2019